# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- gug.registrar@gmail.com दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./८०३८/२०२१ दि. १३/१२/२०२१

## परिपत्रक

विषय :- दि. १८ डिसेंबर, २०२१ हा दिवस अल्पसंख्याक हक्क दिवस म्हणून साजरा करण्याबाबत.

संदर्भ :- १. महाराष्ट्र शासन, अल्पसंख्यांक विकास विभाग, शासन परिपत्रक क्र: अविवि-२०२१/प्र.क्र७५/का.८, मंत्रालय मुंबई, दि. ०७/१२/२०२१.

२. महाराष्ट्र शासन, उच्च शिक्षण संचालनालय, महा. राज्य पुणे पत्र क्र.उशिस/मवि-१/२०२०-२१/संकीर्ण/१४०७४, दि. ०८/१२/२०२१.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे मा. प्राचार्य व विद्यापीठाच्या सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख यांना याद्वारे कळविण्यात येते की, कोव्हिड-१९ विषाणूच्या संसर्गाची पार्श्वभुमी विचारात घेता केंद्र/राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार लोक सहभागाबाबत योग्य खबरदारी घेवून तसेच कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजनेच्या अनुषंगाने अपेक्षित असलेल्या कोविड अनुरुप वर्तनांचे काटेकोरपणे पालन करुन दि. १८ डिसेंबर, २०२१ हा **अल्पसंख्यांक हक्क दिवस** म्हणून साजरा करण्याबाबत संदर्भ क्र. १ चे अल्पसंख्यांक विकास विभागाचे शासन परिपत्रक निर्गमित झाले आहे.

त्याअनुषंगाने सर्व संबंधितांनी वरील संदर्भ क्र. १ व २ चे अवलोकन करुन त्यानुसार कार्यवाही घ्यावी व त्याचा अहवाल सादर करावा.

संलग्न - वरीलप्रमाणे.

१३।१२।२०२१

**(डॉ. अनिल चिताडे)**
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी :-**

१. मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरुंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीस्तव सविनय सादर.
४. सर्व शैक्षणिक विभागांचे मा. विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीस्तव सविनय सादर.
५. सर्व प्रशासकिय विभागांचे मा. विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
६. डॉ. विवेक जोशी, सहयोगी प्राध्यापक, डॉ. नरेश मडावी, सहा. प्राध्यापक व डॉ. रजनी वाढई, सहा. प्राध्यापक यांना माहिती तथा विद्यापीठात उपरोक्त कार्यक्रम आयोजनाच्या अनुषंगाने कार्यवाहीस्तव सविनय सादर.
७. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
८. आस्थापना व प्रशासन विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**(डॉ. विजय सिलारे)**
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत पुणे ०१

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. ...... दि. ............
जावक क्र. 10887 दि. 9/12/21

web: www.dhepune.gov.in
Mail: mavi.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२६९३९
फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/मवि-१/.२०२०-२१/संकीर्ण/ 15074
दि. ७.१२.२०२१
इमेलद्वारा

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली - 8 DEC 2021
आस्थापना विभाग
आवक क्र. 12767 दि. 09/12/021
जावक क्र.............. दि...........

प्रति

१. सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण

२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठ

**विषय :- दि. १८ डिसेंबर हा दिवस अल्पसंख्यांक हक्क दिवस म्हणून साजरा करण्याबाबत.**

संदर्भ :- अल्पसंख्यांक विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक अविवि-२०२१/प्र.क्र. ७५/ का-८, दि. ७ डिसेंबर, २०२१

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन परिपत्रकाची प्रत सोबत जोडलेली आहे. कृपया अवलोकन व्हावे.

राज्यातील कोव्हीड १९ विषाणूच्या संसर्गाची पार्श्वभूमी विचारात घेता, सदरहू शासन परिपत्रकाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. तसेच आपल्या अधिनस्त शासकीय, अशासकीय अनुदानित, विना अनुदानित / कायम विनाअनुदानित महाविद्यालये / संस्था / मॉडेल डिग्री कॉलेज / वसतिगृहे व परिसंस्था यांना आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करावा.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य पुणे - १.

प्रत :- १. मा. अप्पर मुख्य सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

AR(ESH)
9/12

Dr. Deshmukh (AR)
10.12.21

श्री सोनकांबळे
10.12.2021

Scanned with CamScanner

दिनांक १८ डिसेंबर हा दिवस
"अल्पसंख्याक हक्क दिवस" म्हणून
साजरा करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**अल्पसंख्याक विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः अविवि - २०२१/प्र.क्र. ७५/का.८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ०७ डिसेंबर, २०२१.

**प्रस्तावना -**

संयुक्त राष्ट्र संघटनेने दि.१८ डिसेंबर, १९९२ रोजी राष्ट्रीय, वांशिक, धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याकांच्या हक्काचा जाहीरनामा स्विकृत करुन प्रस्तृत केला आहे. त्यानुसार अल्पसंख्याक नागरिकांना त्यांची संस्कृती, भाषा, धर्म, परंपरा इत्यादींचे संवर्धन करता यावे, तसेच याबाबतचे वैशिष्ट्यांची प्रभावीपणे अभिव्यक्ती करता यावी याद्दष्टीने प्रयत्न करण्याबाबत राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाने सूचना दिल्या आहेत. त्यानुसार प्रत्येक वर्षी दि.१८ डिसेंबर हा दिवस "अल्पसंख्याक हक्क दिवस" म्हणून महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत राबविण्यात येतो.

**शासन परिपत्रक -**

दिनांक १८ डिसेंबर हा दिवस राज्यपातळीवर प्रतिवर्षी "अल्पसंख्याक हक्क दिवस" म्हणून साजरा करण्यात यावा. याद्दष्टीने या दिनांकास कोव्हीड-१९ विषाणूच्या संसर्गाची पार्श्वभूमी विचारात घेता केंद्र/राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार लोक सहभागाबाबत योग्य खबरदारी घेऊन खालीलप्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत:-

१. अल्पसंख्याक नागरिकांना त्यांच्या घटनात्मक व कायदेशीर हक्कांची जाणीव/ माहिती देण्यासाठी Online/वेबिनार (Webinar) इत्यादी पध्दतीने विविध कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

२. कोव्हीड १९ च्या पार्श्वभूमीवर केंद्र/राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार विद्यापीठे, महाविद्यालये आणि शाळांमध्ये कार्यक्रम आयोजित करण्याबाबत निर्णय घेण्यात यावा.

३. महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत अल्पसंख्याकांसाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांना व्याख्याने, चर्चासत्रे इत्यादीव्दारे Online/वेबिनार (Webinar) इत्यादी पध्दतीने प्रसिध्दी देण्यात यावी.

४. राज्यात हा उपक्रम व्यापक प्रमाणात राबविण्यासाठी सर्व जिल्ह्यात सूचना देणे, कार्यक्रमाची रुपरेषा ठरविणे, कार्यक्रमांचे आयोजन मार्गदर्शन करणे इत्यादी जबाबदारी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाची राहील. तसेच जिल्ह्यात हा उपक्रम व्यापक प्रमाणात राबविण्याची जबाबदारी

सर्व जिल्हाधिकाऱ्यांवर सोपविण्यात येत आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगास शासनाकडून, "मागणी क्र. झेड ई-१, मुख्य लेखाशीर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण ०२ समाज कल्याण २०० व इतर कार्यक्रम २०० इतर कार्यक्रम, राज्य योजनेंतर्गत योजना (०१) अल्पसंख्याकांना सहाय्य (०१) (१२) संशोधन, प्रशिक्षण व योजनांना प्रसिध्दी याकरिता सहायक अनुदान (२२३५-ए-१८७) ३१, सहायक अनुदान" या लेखाशिर्षाखाली प्रतिवर्षी देण्यात येणाऱ्या अनुदानातून रु.१०.०० लक्ष इतक्या मर्यादेत खर्च करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

५. कोव्हीड १९ च्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य शासनांच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करून Online/ वेबिनार (Webinar) इत्यादी व्दारा जास्तीत जास्त व्याख्यानमाला, परिसंवाद, चर्चासत्र इ. कार्यक्रम आयोजित करावे.

६. उपरोक्त सूचनांआधारे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाचा अहवाल सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग व जिल्हाधिकारी यांनी शासनास सादर करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेताक २०२११२०७१५१८०६९४१४ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

DINESH MADHAVRAO SONAVANE

Digitally signed by DINESH MADHAVRAO SONAVANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MINORITY DEVELOPMENT DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9cabb099fd0576208f4caa310d2e7860201ab5363a2133e0927ff26c0f016fdf, pseudonym=1F9A10571D88646ED6CD168DADBFEDACC3DD2F35, serialNumber=6ADB2BDBBD3BD651A8ADE80686E4AEA66DAA5512EA788889AF1515751ABC0181, cn=DINESH MADHAVRAO SONAVANE
Date: 2021.12.07 15:20:38 +05'30'

**(दि. मा. सोनवणे)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. विरोधी पक्षनेता, विधानसभा व विधापरिषद यांचे खाजगी सचिव,
५. उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई,
६. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक,
७. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. सर्व विभागीय आयुक्त,
९. सर्व जिल्हाधिकारी,
१०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,